**स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविण्यात येणाऱ्या विजाभज आश्रमशाळा/ निवासीशाळा/ विद्यानिकेतन मधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या संच मान्यता व वैयक्तीक मान्यता प्रदान करण्यासाठी समिती गठीत करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण विभाग**

**शासन निर्णय क्र. विभशा-२०१७/प्र.क्र.३०१/ विजाभज-२**

**मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२**

**दि. १५ जानेवरी, २०१८**

**वाचा:-** १. शासन निर्णय क्र. विभशा-२०१७/प्र.क्र.२१०/ विजाभज-२, दि. १६ ऑक्टोंबर २०१२.

२. शासन निर्णय क्र. विभशा-२०१७/प्र.क्र.२१०/ विजाभज-२, दि. ०२ मार्च २०१६.

**प्रस्तावना :-**

राज्यातील शासनमान्य स्वयंसेवी संस्थेमार्फत चालविल्या जाणाऱ्या विजाभज आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदांना संच मान्यता देण्याचे अधिकार संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना संदर्भीय क्र.२ च्या शासन निर्णयान्वये प्रदान करण्यात आले होते. तथापि, राज्याच्या प्रत्येक जिल्हयाच्या आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदांची संच मान्यता करुन घेण्यासाठी संचालनालयाच्या पुणे येथील कार्यालयात हजर राहणे शक्य नसल्याने राज्यातील सर्व आश्रमशाळांच्या संस्थाचालकांनी व लोकप्रतिनिधींनी शासनाकडे नाराजी व्यक्ती केली व संच मान्यतेचे अधिकार पूर्वीप्रमाणेच जिल्हयाच्या सहाय्यक आयुक्त कार्यालयास देण्याची विनंती केली. तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदांना वैयक्तीक मान्यता प्रदान करताना बऱ्याच पदांना नियमबाहयरित्या मान्यता देण्यात येत असल्याच्या बाबी शासनाच्या निदर्शनास आल्या आहेत. त्यामुळे शासनाने शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना संच मान्यता प्रदान करण्यासाठी जिल्हा स्तरावर व वैयक्तीक मान्यता प्रदान करण्यासाठी प्रादेशिक स्तरावर समिती गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्यातील शासन मान्यताप्राप्त स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या विजाभज आश्रमशाळा/विद्यानिकेतन व ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठींच्या आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाराऱ्यांची पदे निर्धारित करुन एकूण पदांना संच मान्यता प्रदान करताना सुसूत्रता व पारदर्शकता असणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्हास्तरावर आश्रमशाळेची प्राथमिक तपासणी झाल्यानंतर संबंधित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या एकूण पंदाना संच मान्यता देण्यासंदर्भात जिल्हयाच्या विजाभज आश्रमशाळांकडून प्राप्त होणारे संच मान्यतेच्या प्रस्तावांची छाननी करुन शासन नियमानुसार संबंधित आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षापासून प्रत्येक जिल्हयाकरिता जिल्हास्तरावर संचमान्यता प्रदान करण्यासाठी आणि प्रत्येक प्रादेशिक स्तरावर वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यासाठी पुढीलप्रमाणे समितीचे गठण करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. संचमान्यता प्रदान करण्यासाठी जिल्हास्तरीय समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | जिल्हास्तरीय समितीचे अधिकारी (संचमान्यता देण्यासाठी) | पदनाम |
|---|---|---|
| १. | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण/सहाय्यक संचालक,विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (संबंधित जिल्हा) | अध्यक्ष |
| २. | जिल्हा महिला व बालविकास अधिकारी (संबंधित जिल्हा) | सदस्य |
| ३. | शिक्षणाधिकारी, प्राथमिक/माध्यमिक (संबंधित जिल्हा) | सदस्य |
| ४. | लेखाधिकारी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण कार्यालय (संबंधित जिल्हा) | सदस्य |
| ५. | समाजकल्याण निरीक्षक, सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण/विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (संबंधित जिल्हा) | सदस्य सचिव |

३. **जिल्हास्तरीय समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील:-**

१) शैक्षणिक वर्ष सुरु झाल्यानंतर आश्रमशाळांची तपासणी कोणत्या कालावधीत करण्यात यावी, याबाबत निर्णय घेणे.

२) आश्रमशाळा तपासणीचा कालावधी निश्चित केल्यानंतर त्याबाबत परिपत्रक निर्गमित जिल्हयातील सर्व आश्रमशाळांना कळविणेबाबत सूचना देणे.

३) आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे मंजूर करताना संबंधित आश्रमशाळेतील शैक्षणिक, निवासी व भौतिक सोयी सुविधांचा आढावा घेणे.

४) मागील चार तपासणी अहवालात ज्या त्रुटी आहेत त्याची पूर्तता झाली किंवा नाही याचा आढावा घेणे.

५) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकूण पदे निर्धारित करुन मंजुरी देताना संबंधित आश्रमशाळेतील मागील तीन तपासणी अहवालाच्यावेळी प्रत्यक्षात हजर असलेल्या विद्यार्थ्यांची सरासरी उपस्थिती विचारात घेऊनच एकूण मंजूर होणारी पदे निश्चित करुन देणे.

६) संस्थेने संबंधित आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकातर्फे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची एकूण पदे मंजुरीचा प्रस्ताव सादर केल्यास त्याचा स्विकार करुन संस्थेतर्फे थेट सादर केलेल्या प्रस्तावाचा स्विकार न करणे.

७) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे पदांना संच मान्यता देताना विद्यार्थी निर्गम उतारे, आधारकार्ड, विद्यार्थी नोंदणी रजिस्टर सादर करण्याचे निर्देश आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकांना देणे.

८) बायोमॅट्रिक प्रणालीवरील विद्यार्थी उपस्थितीप्रमाणेच आश्रमशाळेच्या पदांना संच मान्यता देणे.

९) आधारकार्ड नसलेले विद्यार्थी यांना संच मान्यता देताना ग्राहय न धरणे.

१०) ज्या विद्यार्थ्यांनी आधारकार्ड सादर केले नसतील त्यांचेकडून आधारकार्ड प्राप्त करुन घेण्याचे निर्देश देणे आणि आधार कार्डाशिवाय त्यांचे नाव संचमान्यतेमध्ये ग्राहय न धरणे.

११) तपासणीत आढळून आलेल्या त्रुटी पुर्ततेच्या अधीन राहूनच प्रथमत: एक महिन्यासाठी संचमान्यता देणे. तद्‌नंतर त्रुटींची पूर्तता झाल्यानंतर नियमित संचमान्यता देणे.

१२) विद्यार्थी पटसंख्या अथवा प्रत्यक्षातील विद्यार्थी संख्या विचारात घेताना प्रत्येक वर्षाच्या सप्टेंबर महिन्याच्या मध्यातील किंवा ३० सप्टेंबर अखेरची फक्त आधारकार्ड असलेली विद्यार्थी संख्या विचारात घेऊन संच मान्यता प्रदान करणे.

१३) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना संच मान्यता देताना शालेय शिक्षण व क्रिडा विभागाकडील संगणकीय संच मान्यता प्रणालीचा अवलंब करुन संच मान्यता देणे.

१४) संस्थेने अथवा आश्रमशाळेच्या मुख्याध्यापकाने वाढीव अथवा खोटी विद्यार्थी संख्या दाखविली नसल्याची खबरदारी घेणे.

१५) जिल्हयातील आश्रमशाळांमधील अतिरिक्त कर्मचाऱ्यांची यादी जेष्ठतेप्रमाणे तयार केली आहे किंवा नाही त्याचा आढावा घेणे.

१६) राज्यात अतिरिक्त शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचारी यांना अगोदर समायोजित करण्याच्या अटीवर आणि अनुकंपाचे ज्येष्ठतासूचीत प्रलंबित प्रस्ताव ग्राहय धरुनच मान्यता देणे.

१७) आश्रमशाळांमध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्त्यासंदर्भात स्वतंत्र रजिस्टर ठेवले आहे किंवा नाही आणि त्याची जेष्ठता निश्चित करुन यादी तयार केली आहे किंवा नाही त्याची तपासणी करणे.

१८) कोणत्याही परिस्थितीत वाढीव पदे मंजूर केली जाणार नाही याची दक्षता घेणे व मंजूर बिंदु नामावली प्रमाणेच मान्यता देणे.

१९) जे प्रकरण वरील अटी व शर्तीमध्ये बसत नाही ते प्रकरण विभागीय समितीच्या मान्यतेसाठी पाठविणे.

४. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन आणि ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींची आश्रमशाळांची संचमान्यता देताना ज्या शैक्षणिक वर्षाची संचमान्यता असेल (उदा. सन २०१७-१८ ची संचमान्यता असेल तर) आणि दि.३०.०९.२०१७ रोजी जी विद्यार्थीसंख्या आहे, ती विचारात घेऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय समितीने प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त दोन महिन्यात संचमान्यता देण्याची कार्यवाही करावी. जर या कालावधीत संचमान्यता देण्यात आली नाही तर याबाबतचा प्रस्ताव प्रादेशिक समितीकडे पाठवावा. प्रादेशिक समितीने सुध्दा सदरहू प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत संचमान्यता देण्याची कार्यवाही करावी. प्रादेशिक समितीने सुध्दा एक महिन्यांच्या कालावधीत संचमान्यता दिली नाही तर संचमान्यतेचा प्रस्ताव संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे सादर करावा व संचालकांनी कोणत्याही परिस्थितीत प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक महिन्याच्या कलावधीत संचमान्यता देण्याची कार्यवाही करावी.

५. वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यासाठी प्रादेशिक समितीची रचना खालीलप्रमाणे असेल:-

| अ.क्र. | प्रादेशिक समितीचे अधिकारी (वैयक्तिक मान्यता प्रदान करण्यासाठी) | पदनाम |
|---|---|---|
| १. | प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/प्रादेशिक उपसंचालक,विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (संबंधित विभाग) | अध्यक्ष |
| २. | शिक्षण उपसंचालक, शिक्षण विभाग (संबंधित विभाग) | सदस्य |
| ३. | सहाय्यक आयुक्त, मावक, विभागीय आयुक्त, कार्यालय (संबंधित विभाग) | सदस्य |
| ४. | सहाय्यक संचालक, लेखापरिक्षण, प्रादेशिक उपायुक्त कार्यालय (संबंधित विभाग) | सदस्य |
| ५. | सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण/सहाय्यक संचालक,विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण (संबंधित जिल्हा) | सदस्य सचिव |

**६. प्रादेशिक समितीची कर्तव्ये व जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे असतील:-**

१) शासनमान्य स्वयंसेवी संसथेने त्यांच्या आश्रमशाळेत शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची जी पदे भरली असतील त्याबाबत खालील बाबी तपासणे:-

अ) संबंधित पदे सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने जाहिरात प्रसिध्द करुन भरली आहेत किंवा कसे

आ) जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या अर्जामधून शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार लेखी परीक्षा/मुलाखतीद्वारे व शासन नियमानुसार समिती स्थापन करुन पदे भरली आहेत किंवा कसे, तसेच सामान्य प्रशासन विभाग/ मा.न्यायालयाने दिलेले आदेश/ निर्णय यांचे पालन झाले आहे किंवा कसे

इ) पदे भरताना शासनाच्या आरक्षण विषयक धोरणानुसार व नियमानुसार भरली आहेत किंवा कसे

ई) सामाजिक आरक्षणाव्यतिरिक्त महिला दिव्यांग, माजी सैनिक, विधवा, अनुकंपा, प्रकल्पग्रस्त, परितक्त्या इत्यादीकरिता समांतर आरक्षण ठेवले आहे किंवा कसे

उ) बिंदुनामावली मागासवर्गीय कक्षाकडून तपासून व प्रमाणित करुन त्यानुसार कर्मचारी भरती करण्यात आली किंवा कसे

ऊ) जिल्हा, विभाग व राज्य स्तरावरील अतिरिक्त कर्मचाऱ्यांमधून पदे न भरता नवीन नियुक्ती केली आहे किंवा कसे, अथवा अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजनाशिवाय नवीन कर्मचाऱ्यांची भरती करण्यात आली आहे किंवा कसे

ऋ) अनुकंपाचे किती प्रस्ताव प्रलंबित आहेत?

ऌ) कर्मचाऱ्याचे पदासाठी आश्रमशाळेत आवश्यक तेवढे कामकाज उपलब्ध आहे किंवा कसे

ऍ) संस्थेने संबंधित कर्मचाऱ्यास दिलेले नियुक्ती पत्र शासनाने विहित केलेल्या नमुन्यात व संस्थेच्या लेटर हेडवर आहे किंवा कसे आणि त्यास कोणत्या प्रवर्गातून नियुक्ती देण्यात आली आहे, त्याबाबत नियुक्ती पत्रात नमूद केले आहे किंवा कसे.

२) प्रादेशिक विभागाच्या जिल्हयातील आश्रमशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पूर्वी परिविक्षाधीन कालावधीसाठी अथवा तात्पुरत्या कालावधीसाठी दिलेल्या प्रकरणांची पडताळणी करणे.

३) कर्मचाऱ्यांची सेवा पुढे सुरु ठेवावी, कायम करावी, खंडित अथवा स्थगित करावी याबाबत निर्णय घेऊन मान्यता देणे.

४) कर्मचाऱ्यांना यापूर्वी परिविक्षाधीन अथवा तात्पुरत्या स्वरुपात मान्यता दिल्या असल्यातरी त्या मान्यता बिंदूनामावलीप्रमाणे नियमानुसार योग्य आहे किंवा कसे याची पडताळणी करणे.

५) कर्मचारी भरतीची जी प्रकरणे शासनाच्या नियमात बसत नाहीत अशी प्रकरणे शासनाकडे पाठविणे.

६) आश्रमशाळांतील सर्व विद्यार्थ्यांना आधारकार्डशिवाय मान्यता न देणे.

७) मागील पाच अहवाल विचरात घेवून त्यात ज्या त्रुटी आढलल्या त्यांची पूर्तता झाली का ?

८) जिल्हयातील व विभागांतर्गत ज्या आश्रमशाळांतील विद्यार्थी पटसंख्या वाढली असेल अशा शाळांचे तुकडीवाढीचे प्रस्ताव संचालनालयामार्फत शासनास सादर करणे.

९) शासनाकडून वर्ग मंजूरीस अथवा तुकडी वाढीस मान्यता मिळाल्याशिवाय कर्मचारी नेमणूकीस मान्यता न देणे.

१०) विभागातील विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या आश्रमशाळांतील कर्मचाऱ्यांच्या सेवाविषयक प्रकरणांमध्ये घेण्यात येणाऱ्या निर्णयामध्ये सूसुत्रता व पारदर्शकता ठेवून प्राप्त प्रकरणे नियमानुसार वेळेत निकाली काढली जातील याबाबत खबरदारी घेणे.

११) अनियमितता व अन्याय होऊन कर्मचाऱ्यांत कोणत्याही प्रकारचा असंतोष निर्माण होणार नाही, यासाठी उपाययोजना करणे.

१२) अतिरिक्त कर्मचाऱ्याचे समायोजन वेळेत व्हावे व विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीस चालना मिळावी यासाठी प्रयत्न करणे. तसेच अतिरिक्त कर्मचाऱ्यांच्या समायोजनाशिवाय नवीन कर्मचाऱ्यांचे पदभरतीस मान्यता न देणे.

१३) पदभरतीचे जाहीरातीला मान्यता देण्यापूर्वी शासनाची मान्यता घेणे.

१४) कर्मचाऱ्यांची नियमित वेतनश्रेणी, पदोन्नती, वरीष्ठश्रेणी, निवडश्रेणी इत्यादी शासन नियमानुसार देण्यात आली किंवा नाही, याची तपासणी करणे.

१५) प्रादेशिक विभागातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांची यादी नियमानुसार व जेष्ठतेनुसार तयार करण्यात आली आहे किंवा नाही, याची तपासणी करणे. तसेच अनुकंपा तत्वावरील कोणतेही प्रकरण प्रलंबित नाही याची खात्री करणे.

१६) प्रथमत: जिल्हयातील व नंतर प्रादेशिक विभागातील अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन जेष्ठतेनुसार व नियमाप्रमाणे झालेले आहे किंवा नाही याची खबरदारी घेणे.

१७) संस्थेचे व्यवस्थापनाकडून अथवा जिल्हयाचे सहाय्यक आयुक्त यांचेकडून संबंधित आश्रमशाळेचे मुख्याध्यापक/शाळाप्रमुख यांचेकडून कोणतीही नियमबाहय कामे होत नसल्याची खात्री करुन घेणे.

१८) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना वैयक्तिक मान्यता देताना शासन नियमांचे तंतोतंत पालन करण्यात येईल याची खबरदारी घेणे.

१९) तपासणीत आढळून आलेल्या त्रुटींची एक महिन्यात पूर्तता झाली नाही तर वैयक्तिक मान्यता न देता असे प्रस्ताव संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय,पुणे यांच्याकडे पाठविणे.

२०) संस्थेचे व्यवस्थापन, आश्रमशाळेचे मुख्याध्यापक/ आश्रमशाळा प्रमुख अथवा सहाय्यक आयुक्त यांचेकडून अन्याय झाल्यासंदर्भात कर्मचाऱ्याकडून प्राप्त झालेल्या तक्रारीचे अनुषंगाने नियमानुसार निर्णय घेऊन संबंधितास दिलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देणे.

२१) वैयक्तिक मान्यता प्रदान करताना संस्थेने/ व्यवस्थापनाने संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचेकडे त्या पदासाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता आहे किंवा नाही, त्याचे वय शासनाने विहित करुन दिलेल्या वयोमर्यादेनुसार आहे किंवा नाही, याबाबत खात्री करणे.

२२) कोणत्याही परिस्थितीत वयोमर्यादा ओलांडलेल्या, आरक्षणाचे धोरणाविरुध्द नियुक्ती केलेल्या, आवश्यक शैक्षणिक अर्हता नसलेल्या कर्मचाऱ्याचे पदास वैयक्तिक मान्यता दिली जाणार नाही, याची खबरदारी घेणे.

२३) संबंधित संस्थेने नियमाप्रमाणे नियुक्ती दिलेल्या प्रकरणी नियुक्ती दिल्याच्या दिनांकापासून त्या कर्मचाऱ्याचे पदास एका महिन्यात वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याची खबरदारी घेणे. उशीरा आलेले प्रस्ताव संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे पाठविणे.

२४) संबंधित कर्मचाऱ्याचे पदास वैयक्तिक मान्यता का प्रदान करता येणार नाही. त्याबाबतची कारणे नमूद करुन तसे संबंधित कर्मचाऱ्यास कळविण्याचे निर्देश देणे.

२५) शासनाचे आजपर्यंतचे शासन निर्णय/परिपत्रक यांचे पालन करुनच मान्यता द्यावी.

७. प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, विद्यानिकेतन आणि ऊसतोड कामगारांच्या मुला-मुलींची आश्रमशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पदांना वैयक्तिक मान्यता देताना ज्या शैक्षणिक वर्षाची वैयक्तिक मान्यता असेल (उदा. सन २०१७-१८ ची वैयक्तिक मान्यता असेल तर ) आणि दि.३०.०९.२०१७ रोजी जी विद्यार्थीसंख्या आहे, ती विचारात घेऊन प्राप्त झालेल्या प्रस्तावाच्या अनुषंगाने प्रादेशिक स्तरीय समितीने प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक महिन्यात वैयक्तिक मान्यता देण्याची कार्यवाही

करावी. जर या कालावधीत वैयक्तिक मान्यता देण्यात आली नाही तर याबाबतचा प्रस्ताव संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे पाठवावा. संचालकांनी सदरहू प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर जास्तीत जास्त एक महिन्याच्या कालावधीत पदांना वैयक्तिक मान्यता देण्याची कार्यवाही करावी. संचालकांनी सुध्दा एक महिन्यांच्या कालावधीत वैयक्तिक मान्यता दिली नाही तर पदांना वैयक्तिक मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करावा व शासनाने कोणत्याही परिस्थितीत सदर प्रस्ताव प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून जास्तीत जास्त एक महिन्याच्या कलावधीत पदांना वैयक्तिक मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

८. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्रमांक २०१८०११५१६५०५७११२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice And Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2018.01.15 16:57:21 +05'30'

**(भा. र.गावित)**

सह-सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत -**

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.मंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
४. मा.राज्यमंत्री, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे खाजगी सचिव.
५. सचिव, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण यांचे स्वीय सहाय्यक.
६. संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, संचालनालय, पुणे
७. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९. विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव
१०. सर्व विभागीय आयुक्त, महाराष्ट्र राज्य,
११. जिल्हाधिकारी, सर्व
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१३. महालेखाकार (वित्त व लेखा), महाराष्ट्र १/२ मुंबई/नागपूर
१४. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, (सर्व)
१५. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, (सर्व)
१६. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१७. सर्व मुख्याध्यापक, प्राथमिक/माध्यमिक/उच्च माध्यमिक आश्रमशाळा
१८. निवड नस्ती (विजाभज-२)